# महात्मा फुले कृषि विद्यापीठ

राहुरी - ४१३ ७२२, जि. अहमदनगर.

**कार्यालय : सहाय्यक कुलसचिव (का.व्य./प्राधि.)**

email arofm01.@gmail.com

AROFM Office ☎ (02426) 243222


जा.क्र.का.व्य./आस्थापना/वनपॉईटएंट्री/१२३८/२०२२,

दिनांक :- 9 JUN 2022.

## परिपत्रक

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीचे कार्यक्षेत्र हे दहा जिल्हयांमध्ये असुन मोठया परिसरात विस्तारलेले आहे. या विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात दहा जिल्हयांमध्ये एकूण १२ शासकीय महाविद्यालये आहेत. महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींची संख्याही मोठया प्रमाणावर आहे. या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, शासकीय महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींना अनेकदा कठीण प्रसंगाना सामोरे जावे लागत असुन त्यांना बाहेरील व्यक्तींचा त्रास होतो. तसेच, सध्या कोरोना-१९ चा प्रादुर्भाव पुन्हा वाढत असल्याने पॉझिटिव्ह रुग्णांची संख्याही दिवसेंदिवस वाढत आहे.

सबब, याबाबत खबरदारीचा उपाय म्हणुन या विद्यापीठाच्या अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, महाविद्यालयात प्रवेश करण्यासाठी सुरक्षिततेच्या दृष्टिने सर्वांसाठी **वन पॉईट एंट्री** ठेवावी व सर्वांना एकाच प्रवेशद्वाराने प्रवेश द्यावा. तसेच, प्रवेशद्वारावर सुरक्षा व्यवस्था तैनात करुन मास्क व सॅनिटाईजर वापराविषयी सुचना देण्यात याव्यात. त्याचबरोबर, कोरोना-१९ बाबतीत स्थानिक प्रशासनाच्या सुचनांचे यथोचित पालन करण्याबाबत दक्षता घेण्यात यावी.

सदर आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी व कार्यपूर्ती अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

(प्रमोद लहाळे)
कुलसचिव

**प्रत : माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.**

सहयोगी अधिष्ठाता, डॉ.आ.शि.कृ.अ.तं.म.वि. व पदव्युत्तर महाविद्यालय, मफुकृवि., राहुरी / पुणे / धुळे / कोल्हापुर / कराड / मुक्ताईनगर / नंदुरबार / हाळगांव / काष्टी, मालेगाव.